एका स्वराचं गारूड



खाद्या गोष्टीनं झपाटले जाण्याचा काळ ठराविक मुदतीपुरता असू शकतो. तेवढ्या काळापुरती ती धुंदी, ते झपाटलेपण टिकून राहतं. पुढे सगळं 'इतिहास'जमा होतं. कधी जुन्या स्मृती जाग्या झाल्याच तर अमक्या तमक्या काळात आपण त्या गोष्टीनं एवढे कसे भारावले गेलो होतो, याचं थोडं आश्चर्य, थोडी गंमत वाटत राहते.

हे झालं सर्वसामान्य गोष्टींचं. काही गोष्टींचं वेड असं थोड्या थोडक्या काळापुरतं नसतं. ते आयुष्यभरासाठी असू शकतं. वेड लावणारी ती धुंदी कधी हटायला तयार नसते. लता मंगेशकर नामक दिव्य स्वराचं वेड हे अशाच प्रकारातलं. आज २८ सप्टेंबरला वयाची बहात्तरी पूर्ण करणाऱ्या या गायिकेविषयी पुन:पुन्हा सांगत राहावं असं काही तरी उरतंच. काळालाही पुरून उरणाऱ्या या स्वरमोहिनीबद्दल आजवर अनेकांनी अनेक परींनी बोलून दाखवलंय. उपमांची, अलंकारांची अन् दृष्टांतांची चळत लागावी एवढं स्तुतिगान गाऊन झालंय. तरीही दरवेळी तिच्याविषयी पुन्हा तेवढ्याच नवलाईनं सांगण्याची ऊर्मी येत असते. खूप काही सांगूनही बरंच काही सांगायचं राहिलंय असं वाटायला लावणारं हे विलक्षण असं कोडं आहे. 'सीमा'मधल्या 'सुनो छोटीसी गुडिया की लंबी कहानी' या गाण्यातल्या 'बात ये पूरी सी फिर भी अधूरी सी' या शब्दांसारखाच हा प्रकार.

लता मंगेशकरांनी हिंदी चित्रपटांसाठी किती गाणी गायली त्याची साद्यंत माहिती देणारा एक गीतकोश दहाएक वर्षांपूर्वीच प्रसिद्ध झालाय. या गायिकेच्या बंगाली भाषेतल्या गीतांचा (संपूर्ण शब्दरचनांसह) कोश प्रसिद्ध करणाऱ्या देवाशीष चटर्जी या कलकत्त्याच्या रसिकानंच लताच्या गुजराती भाषेतल्या गीतांच्या कोशाचंही काम पूर्ण करत आणलंय. कुणी मनावर घेतलं तर तिच्या मराठी गीतांचाही असा कोश निघू शकेल. हे सगळे गीतकोश लताच्या गायन कारकिर्दीविषयीची कुठलीही माहिती क्षणभरात देण्यास समर्थ आहेतच. पण या कोशांमधून उलगडू न शकणारी या दैवी स्वरासंबंधीची कोडी मात्र यापुढेही कायम राहतील. कुठली आहेत ही कोडी?



'छुपा लो यूं दिल में प्यार मेरा' (ममता) सारख्या गाण्यातल्या हेमंतकुमारच्या भारावून टाकणाऱ्या आवाजाला 'तुम अपने चरणों में रख लो मुझको' असा प्रतिसाद देताना एखादी विद्युल्लेखा तळपल्याचा भास होतो तो कशामुळे? याच हेमंतकुमारसोबतच्या 'याद किया दिलने कहाँ हो तुम' (पतिता) च्या कडव्यात 'मेरे लिए आसमाँ हो तुम' या ओळीतल्या 'आसमाँ'वर तिनं घेतलेली हलकीशीच, पण अर्थगर्भ अशी हरकत कशी सुचली असावी? नौशादनंही ज्यावरून जीव ओवाळून टाकला ते मदनमोहनचं 'आपकी नजरोंने समझा' (अनपढ) आजवर कितीदा तरी ऐकून झालं. पण 'जी हमें मंजूर है आपका ये फैसला' ही ओळ दुसऱ्यांदा म्हणण्याआधी त्या 'फैसला'वर तिनं घेतलेली गिरकी दरवेळी श्वास रोखायला का लावते, हे कळत नाही.

मदनमोहनच्याच 'सपनों में अगर मेरे' (दुल्हन एक रात की) मधल्या 'तो सो जाऊं' या शब्दांशी ती लाडीक झटापट करणं तिला कसं जमू शकतं? अन् सलील चौधरींच्या 'जिया लागे ना' (आनंद) मधल्या 'पिया तेरी बावरी से रहा जाए ना' या ओळींमधली आंदोलनं घेताना स्वरातला गोडवा तिळमात्र ढळू न देण्याचं कसब तिला कसं साधतं हेही अजून कळायचंय. काही प्रश्नांची उत्तरं न मिळण्यातही आनंद असतोच. मान्य आहे, की गाण्यातल्या या सर्व करामती, ही सगळी सौंदर्यस्थळं त्या त्या संगीतकारांच्या कल्पनेतून साकारली असणार. पण संगीतकारांच्या कल्पनांना कमालीचं मूर्तरूप देणारे किती गायक अन गायिका आपल्याकडे झाले?

लताची आवाजाची 'तयारी' दाखवून द्यायला 'मनमोहना बडे झूठे', 'बैरन नींद न आए', 'कटना अनाडी मन भाए' सारख्या कितीतरी गाण्यांचे दाखले देता येतील. पण चित्रपट संगीत हे असं 'शड्डू ठोकून' गायचं माध्यम कधीच नव्हतं. इथं आवाजाची तयारी तर हवीच. पण त्याहून गरज आहे ती वेगळ्या गोष्टींची. केवळ आवाजाच्या तयारीच्या वा अपार गोडव्याच्या बळावर लताला हे स्थान ग्रहण करता आलं असतं का? स्वरमाधुर्य हा तर तिचा स्थायीभाव आहेच. पण त्या जोडीला आहे विलक्षण प्रभावी असं शब्दफेकीचं तंत्र, आवाज कसाही वळवू शकणारी 'फिरत', भावपूर्ण गायन अन् सर्वांसाठी वस्तुपाठ ठरावं असं शब्दांचं उच्चारण. हिंदी अन् उर्दू या दोन भाषांमधला लहेजा, त्यातल्या सूक्ष्म भेदांसह तिच्या गाण्यांमधून डोकावताना दिसतो. 'किस्मत', 'खफा', 'तख्त' यांसारख्या उर्दू शब्दांच्या उच्चाराची तिची सहजता तर प्रमाणभूत मानावी अशीच. दोन ओळींमध्ये श्वास केव्हा घेतला हे कळू न देणाऱ्या या गायिकेचं महत्त्व कसं वर्णावं?

'तेरे सुर और मेरे गीत' सारख्या साध्यासोप्या चालीपासून, 'प्रभु तेरो नाम', 'ऐ दिलरुबा', 'रसिके सावे घने' यांसारख्या सर्वार्थानं कसोटी पाहणाऱ्या गाण्यांपर्यंत सर्व ठिकाणी तेवढीच समरसता अन् तन्मयता दाखवणारी गायिका, एखाद्या गाण्याच्या मागणीनुसार आपल्या आवाजाचा 'टोन' कसा बदलते हेही अभ्यासण्याजोगं. एरवी नितळ जळासारख्या आवाजात गाणारी लता कधीमधी 'कुछ दिलने कहा' (अनुपमा), 'तुम्हे याद करते करते (आम्रपाली) सारख्या गाण्यांच्यावेळी आवाजाला एक वेगळीच तरल डूब देते तेव्हा तिच्या बुद्धिमान गायकीची ग्वाही मिळते. चापल्य, हळुवारपणा, आर्तता, व्यापकता या सर्व गुणांचा परमोच्च आविष्कार घडवावा तो लतानं. पूर्वी चित्रपटगीतांच्या ध्वनिमुद्रिकांवर गायक म्हणून त्या त्या सिनेमातल्या पात्रांची नावं असत. 'महल'च्या 'आयेगा आनेवाला'च्या रेकॉर्डवरही गायिका म्हणून 'कामिनी' (चित्रपटातलं मधुबालाचं नाव) असा उल्लेख आढळून येई. ही प्रथा बंद करून त्या ठिकाणी गायक वा गायिकेचं नाव यायला हवं यासाठी आग्रही भूमिका घेणारी एकटी लताच होती. म्हणूनच 'महल'ची ही रेकॉर्ड पुनर्मुद्रित करण्यात आली तेव्हा त्यावर लताचं नाव झळकलं. पुढे हाच बदल रूढ झाला. आपल्या या हक्कांसाठी लतानं वेळप्रसंगी रेकॉर्डिंगवरच नव्हे तर काळाच्या पटलावर आपली मुद्रा कोरली होती. ■ सुनील देशपांडे